

# श्री साई आरती-साई अवधूता

https://www.chalisa.online

जय देव जय देव दत्ता अवधूता ।
साई अवधूता ।
जोडुनि कर तव चरणीं ठेवतों माथा ।
जय देव जय देव ।। धु ।।

अवतरसी तूं येतां धर्मातें ग्लानी ।
नास्तिकांनाही तू लाविसि निजभजनीं ।
दाविसि नाना लीला असंख्य रुपांनीं ।
हरिसी दीनांचें तू संकट दिनरजनी ।। 1 ।।

यवनस्वरुपीं एक्या दर्शन त्वां दिधलें ।
संशय निरसुनियां तदद्घैता घालविलें ।
गोपीचंदा मंदा त्वांची उद्घरिलें ।
मोमिन वंशीं जन्मुनि लोकां तारियल ।। 2 ।।

भेद न तत्वीं हिंदूयवनांचा कांहीं ।
दावायासी झाला पुनरपि नरदेही ।
पाहसिं प्रेमानें तू हिंदूयवनांही ।
दाविसी आत्मत्वाने व्यापक हां साई ।। 3 ।।

देवा साईनाथ त्वत्पदनत व्हावें ।
परमायामोहित जनमोचन झणिं व्हावें ।
त्वत्कृपया सकलांचें संकट निरसावें ।
देशिल तरि दे त्वघश कृष्णानें गावें ।। 4 ।।

|| https://www.chalisa.online ||